Press Control+L for a beautiful view

and then go page down

e Sahity Pratishthaan

एक सुंदर पुस्तक पहाण्यासाठी control+L दाबा

आणि नंतर pagedown करत रहा

ई साहित्य प्रतिष्ठान

# मिनी आणि चानी

अलका पाटील





# मिनी आणि चानी

लेखिका : अलका पाटील

चित्रे : अमृता पाटील

ई साहित्य प्रतिष्ठान



पुस्तकाचे नांव: मिनी आणि चानी

प्रकार : बालगोष्ट

लेखिका : अलका पाटील

alka.patil@gmail.com

ph. 09890687008

0832 2465737

मुखपृष्ठ व अंतर्गत चित्रे: अमृता पाटील

amruta.patil@gmail.com

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

9869674820

*e Sahity Pratishthan®*

*eleventh floor*

*eternity, G1102*

*eastern express highway*

*Thane. 400604*

*Ph : 9869674820*



विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे  पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे कायद्याने आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2013

esahity@gmail.com
www.esahity.com
www.ednyaneshwari.com
http://etyarth.blogspot.in/
http://esahityapratishthan.blogspot.in/
www.marathiriyasat.com



# गोष्टी आधीची खरी खुरी गोष्ट

माझ्या छोटया मित्रानो, या गोष्टीमागे अजून एक लहानशी गोष्ट आहे. मिनीच्या गोष्टीसाठी अमृताने, माझ्या मुलीने चित्रे काढली आहेत. अमृता अगदी लहानपणापासून सारखी चित्रे काढत असे. आणि मला गोष्टी सांगायला खूप आवडते, तर मोठी झाल्यावर ती म्हणे 'तू गोष्ट लिही, मी चित्रे काढीन त्यातली " . मग खरच मी काही गोष्टी लिहिल्या आणि तिने चित्रे काढली. आम्हा दोघींना ते करताना खूप मजा आली. तर तसे हे पुस्तक आम्हा दोघींचे आहे..

आता अमृताची स्वतःची चित्र असलेली दोन पुस्तके (graphic novels ) प्रसिद्ध झाली आहेत. 'कारी '( हार्पर कॉलिन्स प्रकाशन २००८ ) आणि महाभारतावारचे 'आदि पर्व' ( हार्पर कॉलिन्स प्रकाशन , २०१२ ). हे मी का सांगते आहे, तर जे तुम्हाला करायला आवडते ते जरूर करत राहा. आणि आई-बाबा आणि मुले मिळून काही करत असतात तेंव्हा तर फारच गम्मत असते,हो न ? "

**--अलका पाटील ( मिरामार, गोवा)**



# मिनी आणि चानी



एक आहे मिनी. थोडी शहाणी, थोडी गुणी.

आजी म्हणते “मिनी ना? वळलं तर सूत, नाहीतर भूत “

बाबा म्हणतात “आमची मिन्या? बडबड करून डोके खाते  पण नसली तर चैन का पडते?”

आई म्हणते “माझी राणी! अश्शी गुणी, पाहिली नाही कुणी”

शाळेतल्या बाई म्हणतात “गोड आहे”पण मैत्रीणी म्हणतात “जादा शिष्टच आहे”

शेजारचा मनीष म्हणतो “मिनी? मॅड आहे”







मिनी अशी तर मिनी तशी! आहे तरी मग कशी?

अगदी तुमच्या सारखी.

कधी शहाणी, कधी द्वाड.

कधी हुश्शार, कधी ढ.

खूप गोड गोड, थोडी थोडी कडू ,

कधी खूप हसू तर कधी रडू रडू .

अगदी तुमच्यासारखी .



मिनी गोबऱ्या गालाची

अन चिटुकल्या नाकाची.

झिपऱ्या केसांची

नी पडक्या दातांची.

तिची ही गोष्ट,

तिची आणि तिच्या चानीची. ...

आता तुम्ही म्हणाल ही कोण चानी?





तुम्ही खारुताई तर पाहिली असेलच.

झाडावर राहणारी.

सरसर चढणारी आणि झरझर खाली उतरणारी.

चमचमत्या डोळयांची आणि गोन्डेदार  शेपटीची.

तिला कोकणातले लोक म्हणतात चानी. तर ही गोष्ट आहे मिनीच्या चानीची .

पण खारुताई मिनीला भेटली कुठे? ती तर एक गम्मतच आहे.







एकदा घरासमोर आंब्याच्या झाडावर मिनीला दिसली एक खार.

“खारुताई, खारुताई, तुला रामाची शप्पथ.”मिनी पटकन ओरडली.

“कुणाला शपथ घालते आहेस ग?” मिनीची आजी बाहेर डोकवत म्हणाली. मिनीने तिला खार दाखवली.

“अग आजी, खारीला रामाची शप्पथ घातली न कि ती थांबते.”

आजीने हसू दाबत विचारले “हो का ?”

“हो. पण थोडा वेळच थांबते हं. पहायचं आहे तुला ?”



मिनीने पुन्हा जोरात “खारुताई, तुला रामाची शप्पथ” म्हटले, तर खरंच खारूताईने डोके वर उचलले आणि मिनीकडे पाहिले. खरंतर कुठलाही आवाज एकदम झाला तर खारी पटकन पाहतात; पण मिनीला वाटायचं कि त्या रामाच्या शपथे मुळे थांबतात !

“मिनू, खारीच्या पाठीवर ते तीन पत्ते दिसतायत का तुला?” आजीने विचारले, मिनीने पाहिलं, खरंच पाठीवर काळे-पांढरे पट्टे दिसत होते.

“काय झालं ना! रावण सीतेला पळवून घेऊन गेला लंकेला. मध्ये हाSS एवढा मोठा समुद्र. पलीकडे जायचं कसं?”

आजीची गोष्ट सुरु झाली . ……





”मग रामाच्या सैन्यातल्या माकडांनी केलं काय की, मोट्ठे मोट्ठे दगड पाण्यात टाकून लंकेपर्यंत पूल बांधायला सुरवात केली. एक खार हे पाहत होती. तिने ठरवले कि आपण पण रामाला मदत करायची. मग तिने केले काय, शेपटीचा गोन्डा वाळूत घोळवला आणि पुलाच्या दगडांच्या फटीत वाळू टाकू लागली. बिचारीचे अगदी दमून


esahity@gmail.com





जाईतो  काम चालू होतं. ते पाहून रामाने तिला हळूच उचलले आणि मायेने तिच्या पाठीवरून हात फिरवला त्याने. तर झालं  काय? रामाच्या बोटाच्या खुणा तिच्या पाठीवर उठल्या. तेच ते पट्टे  बरं का."

मिनीला खूपच आवडली गोष्ट. राम किती मायाळू होता नं !

"ओ हो, म्हणूनच ती रामाची शपथ ऐकते न आजी ?"

तेवढ्यात आईची आतून हाक ऐकू आली. जेवायची वेळ झाली, उशीर होईल म्हणून

......



मग मिनी रोजच खार दिसते का ते पाहायला लागली.

ती नेहेमी दिसायचीच असे नाही. देवपूजेसाठी फुलं  काढताना कधी कधी आजी हाक मारे “मिने,ती बघ तुझी चानी” कि धावलीच मिनी. पण तोवर चानी पसार होत असे. त्यात शेजारच्या मनीषची मांजर जवळ असली तर मग विचारायलाच नको. चानी पार झाडाच्या शेंड्याला जाऊन पोचायची.

मनीमाऊ तिच्या हिरव्या-पिवळया डोळयांनी सगळयावर लक्ष ठेऊन असायची. चिमण्या, नाकतोडे आणि सरडे पकडून खाणारी ती मनीमाऊ मिनीला अगदी आवडत नसे.



esahity@gmail.com



पण मिनीचे बाबा सांगत, “मिन्या, मांजर शिकार करणारच. ते तिचं  जेवण असतं नं, प्राणी भूक लागली तरच शिकार करतात बेटा .”मिनीला वाटे, भूक लागली तर दुध-पोळी खावी, चिमण्या कशाला मारायच्या?

किती दिवसांपासून मिनीचा हट्ट चालला होता.  तिला एक कुत्रा पाळायचा होता, छान काळ्याभोर रंगाचा. पण आई म्हणायची मिनी आणि गीताचं  पाहताना तिची पुरेवाट होते, कुत्रा नको आणखी त्यात.  गीता मिनीची छोटी बहिण. बोबडे बोलते आणि सारखी पडते. सारखी मिनीच्या मागे हिंडत असते. तर काय, कुत्रा तर काही मिळणार नाहीय .

मग मिनीने ठरवले आपण आपली खारच  पाळूया.



तेवढ्यात दिवाळीची सुट्टी आली आणि बंगलोरच्या मामाकडे जायचा बेत ठरला. कित्ती मज्जा. राविमामा डॉक्टर होता आणि त्याचं तिकडे हॉस्पिटल होतं . आई, मिनी आणि गीतू बंगलोरला पोचल्या. मामा गाडी घेऊन आला होताच स्टेशनवर. खिडकीतून मिनी तिथले रस्ते, झाडे, बागा पाहत होती. मामाच्या घरी तर मजाच मजा. वर घर, खाली दवाखाना . आणि दवाखान्यात कित्ती बाळे !

आणि रोज लोक मामीला पेढे-बर्फी आणून देणार ! लाड चालू होते एकदम .





रविवारी मामा मिनीला एका झू मध्ये घेऊन गेला. झू मध्ये आपण पिंजऱ्यातले प्राणी बघतो नं! पण हा झू वेगळा होता. तो मामाच्या मित्राचा, रघुनाथचा होता. त्याच्या घरात किती तरी वेगवेगळे साप काचेच्या पेट्यात, बाहेर रिकाम्या हौदात ठेवलेले होते. शिवाय खूप पक्षी पण. एक पाय मोडलेली घार, पंख तुटलेले पोपट आणि काही तर मिनीला माहित पण नसलेले पक्षी. ....



रघुनाथकाकाने तिला सांगितले

“हे सगळे आजारी प्राणी आणि पक्षी आहेत, काही पिल्ले आहेत. ते बरे झाले कि त्यांना रानात सोडून देतो. तोवर त्यांना इथे ठेवतो, औषधे देतो. प्राण्यांना पण अपघात होतात, तेही आजारी पडतात. कधी माणसे त्यांना त्रास देतात. तुझ्या मामाचा जसा लहान मुलांचा दवाखाना आहे न, तसा हा प्राण्यांचा आहे. “

मिनीने तिथे कान तुटलेला कोल्हा पाहिला, हाड मोडलेले हरीण पाहिले आणि एका अजगराला हातपण लावून पाहिला.

घरी परत येताना राविमामा म्हणाला



“ग्रेट माणूस आहे रघुनाथ. इतकी काळजी घेतो तो या प्राण्यांची आणि पक्ष्यांची. आणि बरे झाले कि त्यांना सोडून देतो. कारण पिंजऱ्यात बंद करून ठेवण्यापेक्षा त्यांना योग्य जागी पोचवणे महत्वाचे . होय किनि मिनू?”

हे सगळे घरी जाऊन बाब्बांना कधी सांगते असे झाले होते मिनीला.

तिने मनात ठरवूनच ठाकले की  मोठे झालं  कि आपण प्राण्यांचा डॉक्टर बनायचं.



सुट्टी संपून घरी आल्यावर तिने शेजारच्या मनीषला ते सांगून पण टाकले. पण तो मान हलवत म्हणाला

“प्राण्यांचा डॉक्टर होणे खूप अवघड असते माहितेय? मग तुला घोड्याला, म्हशीला आणि अगदी हत्तीला सुद्धा इंजेक्शन ध्यावे लागेल आणि सिंहाचं सुद्धा ऑपरेशन करावे लागेल माहितेय?”........







अरे बापरे ! म्हणजे खरंच अवघड असणार की. मिनी तर रस्त्यात गाय किंवा म्हैस दिसली कि आजीच्या पाठीमागे लपायची. मिनीने बराच विचार केला आणि तिला एकदम सुचले. तिने बाबांना विचारले, “बाबा, राविमामा लहान मुलांचा डॉक्टर आहे न ?”

“हो बेटा.”

“मग प्राण्याच्या पिल्लांचे पण डॉक्टर असतील नं?”

बाबांना तिची शंका समजली नाही. पण मिनीने मात्र ठरवले कि ती फक्त लहान  पिल्लांची डॉक्टर होणार मोठी झाली की........





रघुनाथकाकाला भेटल्या पासून मिनीचे खारीला पाळण्याचे प्रयत्न फारच जोरात सुरु झाले. गॅरेजच्या छपरावर मिनी तिच्यासाठी वाटीत पाणी ठेऊ लागली. एकदा तिने स्वतःच्या कपातले  दुध पण ठेऊन पाहिले. पण ते मनीषची मनिमाऊ होती ना तिने  पिऊन टाकले आणि वाटी चाटून-पुसून  साफ करून टाकली. मग दुध ठेवणे बंद झाले.

पण चानी काही मिनीच्या जवळ येईना.

“बाबा, खारींना काय आवडते खायला? सांगा ना!”



मिनी हट्ट धरून बसल्यावर बाबांनी कपाटातून एक पुस्तक बाहेर काढले. प्राण्यांच्या बद्दल माहितीचे ते पुस्तक होते. बरीच पाने उलटून बाबांनी एक पान दाखवले. किती तरी प्रकारच्या खारींची चित्रे होती त्यावर.

लहान-मोठ्या,

केसाळ.

काही लाल-लाल

तर काही राखाडी. ....



मग बाबांनी इंग्रजीतून वाचून दाखवले,

“दे इट  फ्रुट्स, नट्स, बार्क  ऑफ ट्रीज  अन्ड  यंग शूट्स.”

म्हणजे  खारीना फळे , बिया, झाडांची साले आणि कोवळे कोम्ब  आवडतात.”

“नट्स  म्हणजे काय बाबा ?”

“म्हणजे बियाच. शेंगदाणे, काजू, बदाम म्हणजे नट्स”.

मग मिनीने छपरावर थोडे दाणे ठेवले. आणि खरंच, खारीला ते कसे समजले माहित नाही पण आली की  ती. मिनीला खूपच मजा वाटली. चानी एकेक दाणा  पुढच्या पायात पकडून छानदार  बसून कुरूकुरू करत खात होती.





मिनीने धावत जाऊन ते बाब्बांना  सांगितले. मग काय, चानी आणि मिनीची अशी दुरून भेट होऊ लागली. हळूहळू चानीला कळले कि मिनी तिला खाऊ देते, मग ती मिनीला घाबरेनाशी झाली. चानी खात असताना मिनी तिच्याशी गोड-गोड बोले.

"चानी, तुला दाणे  आवडतात नं? तू रोज ये, मी दाणे  देईन तुला"

एकदा तर चानीने मजाच केली. मिनी कठड्याला टेकून उभी होती तर चानी सुर्रकन कठड्यावर आली आणि शेपटी इकडून-तिकडे  फडकवित मिनीकडे तिच्या चमकदार डोळ्यांनी पाहत राहिली. आणि एकदम पळून गेली . मिनी आनंदाने फुलून गेली. म्हणजे चानी आता तिची खार  होती ! ……. हळूहळू चानी बाल्कनीत यायला लागली, तुळशीच्या कुंडीवर बसून घरात डोकवायला लागली.



एका रविवारी दुपारच्या वेळी आई गीतुला घेऊन झोपली होती, आजी पण वाचता-वाचता झोपून गेली आणि बाबा टीवीवर क्रिकेट पाहत होते.

मिनी हळूच स्वैपाघरात गेली, स्टुलावर चढून तिने वरच्या कपाटातले डब्यातले मूठभर काजू घेतले आणि बाल्कनीतल्या नेहेमीच्या कोपऱ्यात जाऊन ‘चुक -चुक ‘ आवाज करत चानीला बोलावले.

पलीकडच्या भिंतीवरून टपकन उडी मारून चानी आली आणि सरळ बाल्कनीत मिनीसमोर येऊन बसली.





मिनी हळूच खाली बसली आणि हातात दोन काजू घेऊन तिने उजवा हात पुढे केला. न हलता दोघी एकमेकींकडे पाहत होत्या. चानीने ने हलका ‘चिक-चिक’ असा आवाज केला, शेपटी इकडून-तिकडे नाचवली, थोडा विचार केला नी  हळूच पुढे येउन तिने मिनीच्या हातातला एक काजू घेतला. जरा  मागे सरकून ती मागच्या पायांवर बसली आणि दोन्ही हातात काजू घेऊन कुरतडून खाऊ लागली.

काजू संपला तशी ती पुन्हा पुढे आली आणि या वेळेला काजू घेताना चानीचे अंग मिनीच्या हाताला घासून गेले. किती मऊ अंग होते तिचे ! तीन-चार काजू खावून चानी पळून गेली नि मिनी नाचतच घरात आली . ...





“आई, आई, चानीने  माझ्या हातातून काजू खाल्ले !! “

“काय खाल्लं  ? “

“काजू गं! तिला फार आवडतात”

आई खरंतर  रागावणार होती पण मिनीचा आनंद पाहून तिला खूप मजा वाटली.

तरी तिनं दटावले, “वेडाबाई , रोज रोज काजू नाही हं द्यायचे तिला. शेगदाणे पण चालतात नं तिला? ते पुरेत.”

आईने बाबांना  लेकीचा पराक्रम सांगितला तशी  ते पण हसून म्हणाले -

“देऊ दे ग, आता बघ त्या दोघींची कशी गट्टी होतेय ते.”



आणि खरंच चानी आता मिनूची हाक ओळखायला लागली.

घरात यायला लागली, हातातून खाऊ घ्यायला लागली.

तिला काही दिले नाही तर ती ‘चिर्र-चिर्र’ ओरडत भोवती नाचायची.

मिनीला पण चानी नसली की  करमत  नसे.

शाळेतून आली की  पहिला प्रश्न असे “आई, चानी आली होती ?”

चानी   आता   चक्क   मिनीच्या   हातावरून
खांद्यावर सुर्रकन चढून बसायची.







मिनीला कानाजवळ गुदगुल्या व्हायच्या, खूप हसू यायचं. चानी कानात 'चिक-चिक' ओरडली कि मिनी अगदी आई सारखं म्हणायची -

"अग, हो हो, देते खायला. किती ओरडतेस?"

.........

मिनीच्या शाळेतल्या सगळ्या मैत्रिणी चानीला पाहायला घरी आल्या एकदा



आणि बाई  पण.

मिनी फक्त मनीषच्या  हातात चानीला ठेवायची थोडा वेळ,

ते पण एका अटीवर,

त्याने त्याच्या  मांजरीला कधी इकडे आणायचे नाही.

चानी अशी घरातलीच होऊन गेली.

दिवसभर ती घरात आणि बागेत हिंडे पण रात्री मस्त खिडकीच्या पडद्यावर चढून झोपून जाई.

वीणाआत्याला बाळ  झालं. मिनीने आजी बरोबर तिच्याकडे जाण्याचा हट्ट धरला. तिला नाताळची सुट्टी होतीच. आई-बाबा नंतर बारशाला येतील असे ठरले .





झालं. मिनीचा उत्साह वाहून चालला होता. आईने तिचे नवे कपडे , बाळासाठी बनवलेले कपडे, स्वेटर, आत्यासाठी बनवलेले लाडू सगळे तयार ठेवले होते.मिनी इतक्या दूर आगगाडीतून पहिल्यांदाच जाणार  होती नि ते सुद्धा आईला सोडून. तिला  वीणा आत्या आणि तिचा नवरा सुधीरकाका फार आवडत , मज्जा यायची त्यांच्याबरोबर.

पण जायचा दिवस उजाडला आणि मिनीला वाईट वाटायला लागलं . चानीला पण सोडून जायचं ...तिला रडूच यायला लागलं. रोजसारखी चानी घरात आली, गीताच्या बिस्किटातला तुकडा खात बसली. मिनी बाबांच्या गळयात पडून म्हणाली -

“बाबा, तुम्ही चानीला संभाळाल नं? तिला सकाळी पाणी ठेवाल नं? आणि मनीषच्या माऊला घरात घेऊ नका.”



बाबांनी सांगितले की  ते नक्की सगळे नीट  सांभाळतील.

जायची वेळ झाली, सगळे सामान घेऊन मंडळी स्टेशन वर पोचली, मिनी आणि आजी गाडीच्या डब्यात बसल्या तशी गीतूने रडायला  सुरुवात केली “मला पण जायचं आजी बरोबर”... तिचि समजून घालेतो गाडी सुटली पण.

“बरं  झालं  बाई , वेळेवर सुटली गाडी !”आजी म्हणाली .





पण मिनीचे सारे लक्ष होते खिडकीबाहेर. वाटेत कोणी हात हलवला तर ती पण टाटा करत होती. मस्त वारा येत होता आणि तिच्या झिपऱ्या सगळ्या चेहेऱ्यावर येत होत्या त्याची तिला मजा वाटत होती. गाडी तालात ‘ झुकू-झुकू-झुकू ‘ करत जात होती आणि मिनीला ‘मामाच्या गावाला जाऊया ‘ गाणे आठवत होते. पण ती तर आत्याच्या गावाला चालली होती.





थोड्या वेळाने आजीने बाकाखालची करंडी  बाहेर काढली.







“मिन्या, काही खायचे आहे आहे का ?
निघताना नुसते दूधच प्यायली आहेस.”

करण्डीचे झाकण आजीने उघडले नी
टुपकन चानीने डोके बाहेर काढले !......





"अरे माझ्या देवा !! "आजी ओरडलीच तसे सगळे लोक बघायला लागले की काय झाले. चानी मात्र मिनीच्या मांडीवर चढली आणि तिचं 'चिक-चिक' सुरु झाले. काय करावे ते आजीला सुचेना . शेजारचे लोक पण काहीही विचारायला लागले.

"काय बाई मुलं असतात ! आता या खारीचे काय करणार ? विषारी असतात म्हणे खारी "... काहीतरीच !

मिनीला कळेचना चानी आली कशी करंडीत?

झालं होत काय , करंडीत ठेवल्या होत्या छानदार खायच्या गोष्टी. त्या वासाने चानी शिरली करंडीत नि कोणीतरी झाकण बंद केले असणार. पण आता काय करायचे ?





“आजी, मी नाही आणले चानीला”मिनी रडव्या सुरत म्हणाली.

हो, नाहीतर आजीला वाटायचे मिनीने मुद्दाम आणलेय चानीला.

“ते राहू दे, आता तिला नीट  धरून ठेव म्हणजे झालं  “

आजी रागावली कि काय ? पण जर वेळाने आजीने लाडूचा डबा  बाहेर काढला . मिनीला एक लाडू देऊन म्हणाली-

“हं , दे तिला. बिचारी भुकेली असेल.”

मिनीला एकदम इतकं  बरं  वाटलं. आजीच्या गळयात हात टाकून पापीच घेतली तिने आजीची. आता खारुताईला खाताना पाहताना सगळयांना गम्मत वाटत होती. मग



कोणीतरी तिला शेंगा दिल्या, कोणी पेरु. तो बराचसा मिनीनेच खाल्ला म्हणा. सगळा दिवस मजेत गेला आणि रात्री आजीने चानीला परत करण्डीमध्ये ठेवून दिले.

"आता चुप्प बसायचे आणि झोपायचे. गडबड करायची नाही "आजीने चानीला सांगितले. मिनीला मात्र झोप येत नव्हती तिला वाटत होते की आत्याच्या घरी काय होणार

.......



esahity@gmail.com



आत्याच्या घरात खूप गडबड होती. बरेच पाहुणे आले होते. पण वीणाआत्याच घर मोठ्ठं होतं. मागे मोठं अंगण होत. छान बाग होती.



मिनी पाहत होती. पारिजातक, गुलाब, शिवाय पेरू आणि एक आंब्याचे झाड.

हात-पाय धुवून, मिनीने बाळाला पाहिले. ......



आजीने अगदी सहज म्हटले

“आमच्या बरोबर आणखी एकजण आलेय बाळाला पाहायला. ओळख बरं. आमची चानी पण आली आहें, तिला बाहेर काढ ग मिनू, कंटाळली असेल करंडी  मध्ये बसून.”

चानीच्या येण्याची सर्वांना खूप गम्मत वाटली. मग तिला सुरक्षित जागा कुठली यावर बरीच चर्चा झाली. शेवटी वरच्या माडीवरची नितेशदादाची  अभ्यासाची खोली छान आहे असे ठरले . तिथे खिडक्यांना जाळी  पण होती  त्यामुळे चानी नीट  राहेल  आणि मिनी आणि आजी तिथेच झोपतील असे ठरले.





मिनीला एकदम छान वाटायला लागले. हो, नाहीतर परत सर्वांनी मिनीलाच रागावले असते म्हणजे ?

बाबांचा फोन आल्यावर आजीने हसत हसत त्यांना सगळी गोष्ट सांगितली आणि काही काळजी करू नका असे सांगितले.

आत्याचे बाळ  खूपच पिटुकले आणि गोड होते. त्याचं  करण्यात आजी रमून गेली. मिनीचे पण लाड होत होते.तिला आत्त्याने  एकदम सहा गोष्टींची पुस्तके आणि उड्या  मारायची रंगीत दोरी आणि खेळायची भांडी-कुंडी आणून ठेवली होती.



सगळे छान होते पण चानी अस्वस्थ होती, ती सारखी वर-खाली करत होती. इकडे चढ,तिकडे चढ , कधी टेबलावर तर कधी कपाटावर.

मग मिनीला समजले. बाहेर झाडांवर खारी खेळत होत्या, आवाज करत होत्या ते चानी पहात होती. उत्तर म्हणून ती पण 'चिक-चिक' करत होती आणि खिडकीच्या जाळीवर चढून बाहेर जायचा प्रयत्न करत होती.

"आजी, चानीला बाहेर जायचं आहे ग !"मिनी म्हणाली.

का कुणास ठाऊक, बोलता बोलता मिनीला उदास वाटायला लागलं .


esahity@gmail.com



“हो बेटा , मला माहित आहे. पण तुला वाईट वाटेल  म्हणून मी बोलले नाही. हे बघ मिनू, खारीचं  घर असते झाडांवर. तिथे त्यांना खायला मिळते, खेळायला मिळते, इतर खारींशी बोलायला मिळते. ह्या बंद खोलीत तिला तुरुंगासारखं  वाटत असेल राजा”

मिनीच्या हातावरून चानी तिच्या खांद्यावर चढली होती. मिनीने तिला अलगद दोन्ही हातात घेतले. अगदी जवळ घेऊन तिला नीट  पहिले. कशी गोजिरवाणी दिसत होती चानी. तिला बाहेत सोडले तर ती कदाचित कधीच  परत पण येणार नाही. पण .... मिनीला आठवले रघुनाथ काकाना किती वाईट वाटत असेल त्यांच्या पक्षांना-प्राण्यांना सोडताना . काय बर म्हणाले होते ते? ‘प्राणी पिंजऱ्यात ठेवण्यासाठी नसतात. त्यांनी त्यांच्या जागी जगणेच बरोबर असते. आपल्या मजेसाठी त्यांना बंद नाही करून ठेवायचे “





आजी पाहत होती. मिनीने गच्चीचे  दार उघडले .एकदा चानीला जवळ घेऊन तिच्या पाठीवर आपला गाल घासला आणि मग वर नेउन तिला सोडून दिले. ‘चिर्र-चिर्र’ ओरडत चानी धूम पळाली. पेरूच्या फांदीवर झेपावून  चानी पानात नाहीशी झाली.

“चानी, चानी, रामाची शप्पथ मी रडणार नाही “

............






आता मिनीकडे चानी नाहीय. पण तिच्या छान -छान आठवणी आहेत. आणि टेबलावर एक फोटो ठेवला आहे. एक दात पडलेली मिनी आणि तिच्या खांद्यावर बसलेली चानी ! मिनीचे आणि चानीचे, दोघींचे डोळे आनंदाने चमचम करताहेत.

माझ्या मित्रांनो, तुमच्या जवळ पण अशा आठवणी असतील. तुमच्या लाडक्या मांजराच्या, तुमच्या खेळकर कुत्र्याच्या, मिट्ठू पोपटाच्या नाही, नाहीतर  आणखी कोणाच्या. तुम्हाला कळेल म्हणून सांगितली ही गोष्ट. मिनीची आणि तिच्या चानीची.









बालमित्रांनो आणि आई बाबांनो

लहान मुलांच्या वाढीत गाण्यांचा आणि गोष्टींचा मोठा वाटा असतो. त्यातून संस्कार होतात आणि मन घडत जातं. त्यांना आवडतील अशी गाणी, आणि गोष्टी यांचा खूप मोठा खजिना मराठीत आहे. नवीन काळाप्रमाणे नवीन नवीन गोष्टी आणी गाणी लिहीणारे लेखक आणि कवी आपल्या भाषेत आहेत. त्यांना तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचं काम ई साहित्य प्रतिष्ठान करत असतं. पण तुम्हीसुद्धा त्यांच्यापर्यंत पोहोचलं पाहिजे. हो ना. मग पत्र लिहीणार का तुम्ही अलकामावशीला? आणि अमृताताईने तुमच्यासाठी काढलेली चित्रं आवडली का? मग तिलासुद्धा पत्र लिहा. ते पत्र alka.patil@gmail.com ला पाठवा. मग तुमची मैत्री होईल.



तुम्ही जर गोष्टी लिहत असाल, कविता लिहत असाल तर त्याही पाठवा. त्यासाठी पत्ता आहे esahity@gmail.com . आपण तुमची गाणी आणि गोष्टी जगभर तुमच्यासारख्या मुलांना पाठवूया. मग ते तुमचे मित्र होतील. तुम्हाला पत्र पाठवतील.

आणि तुमच्या इतर मित्रांचे ई मेल आयडी आम्हाला कळवा. मग आम्ही त्यांनाही छान छान गोड गोड मस्त मसालेदार चमचमीत गोष्टी पाठवू.

पाठवणार ना पत्र?

वाट पहातो. बरं का?

तुमचे मित्र

ई साहित्य प्रतिष्ठानचे दादा, ताई, काका, मावशा आणि तुमच्याएवढे मित्र मैत्रिणी...

www.esahity.com